# ख्रिस्ताची सेवा करण्यात मुलांना व तरूणांना आनंद वाटतो

## येशू मुलांसाठी अनुकरण करावा असा सर्वोत्तम आदर्श

मुलांचे वयोगट व सध्याच्या गराजांनुरूप कार्यक्रम निवडा.

**शिक्षकांची प्रार्थना:** "प्रिय प्रभू तू नेहमीच सर्वत्र मुलांवर प्रीती करतोस तुझ्याप्रमाणेच त्यांच्या विषयी आमचे साहाय्य कर."

**मुलांची प्रार्थना:** "प्रिय येशू तू आम्हां मुलांवर प्रेम करतोस आणि आमच्याशी दयाळूपणे कसे वागावे हे लोकांना दाखवतोस याबद्दल तुझे आभार मानतो तुझी सेवा करण्यास आणि तू सांगितलेल्या गोष्टी करण्यास आमचे साहाय्य कर."

येशूने मुलांना कवटाळून व त्यांच्यावर हात ठेवून त्यांना आशीर्वाद दिला (मार्क 10:16)

**चित्र काढा:**

- येशू मुलांची काळजी घेतो हे दाखवणारे आनंदी बाळाचे चित्र मुलांना काढायला सांगा.
- मोठया मुलांनी लहान मुलांना मदत करावी.

काढलेले चित्र आई वडीलांना दाखवून येशू लहान बालकांवर प्रीती करतो हे सांगा. पाह मार्क 10:13–16 मध्ये येशू मुलांची किती काळजी घेतो. हा कथावृत्तांत वाचून दाखवा किंवा सांगा. शक्य असल्यास मोठया मुलाला हा कथावृत्तांत्त वाचायला अथवा सांगायला सांगा.



**मुलांना विचारा:**

- लोकांनी मुलांना येशूकडे का आणले? (मुलांना उत्तर देऊ द्या)
- मुलांना दूर घेऊन जा असे लोकांना कोणी सांगितले?
- मुलांना दूर घालवून दिले जात असल्याचे पाहून येशूला काय वाटले?
- येशूने मुलांबद्दल काय सांगितले?
- मुलांना आमच्या उपासनेमध्ये आमंत्रित करणे किती महत्त्वाचे आहे?

**शैक्षणिक कृती:** आई वडील मुलांना घेऊन येशूकडे आले ते प्रसंग पुन्हा जिवंत करा.

**मुले:** तुम्ही येशूचे शिष्य असल्याचा अभिनय करा.

- आई वडीलांनी त्यांच्या मुलांना येशूकडे आणू नये यासाठी तुम्ही त्यांना कोणती कारणे द्याल? उदाहरणार्थ:
- "येशू खूप कामात आहे."
- "ही मूले खूपच लहान आहेत त्याचे बोलणे त्यांना समजणार नाही."
- "तुम्ही आमच्या थोर शिक्षकाचा अपमान करीत आहात."
- शिष्य काय म्हणतील ते मुलांना सांगू द्या.

**मुले:** आता तुम्ही आई वडील आहात असा अभिनय करा. तुम्ही मुलांना येशूकडे का आणले याची कारणे सांगा.

मुले येशूकडे येतात ह्या कथावृत्तांताचे नाट्यीकरण करा (मार्क 10:13-16)

- उपासनेच्या दरम्यान मोठया माणसांसमोर ही छोटीशी नाटीका सादर करण्याची तयारी करा. त्यासाठी उपसनेच्या पुढाऱ्यांशी बोलून व्यवस्था करा.
- ही नाटिका सादर करण्यासाठी मुलांबरोबर काही मोठया माणसांनी (पुरूषांनी) काम केल्यास त्यातील संदेश अधिक प्रभावीपणे इतरांपर्यन्त पोचवता येईल.
- मोठया मुलांनी लहान मुलांना मदत करावी.
- मोठया मुलांनी किंवा प्रौढांनी आई वडील निवेदक व येशू ह्या भूमिका कराव्यात.
- लहान मुलांनी शिष्य व मुले ह्या भूमिका कराव्यात.

**आई वडील:** मुलांना हात धरून खोलीच्या एका बाजूला बसलेल्या येशूकडे चालत जा. आणि म्हणा, "चला आपण येशूला पाहूया."

**निवेदक:** मार्क 10:13 वाचा.

**शिष्य** (येशूच्या बाजूला उभे राहा) वर शैक्षणिक कृतीमध्ये शिष्यांनी जे सांगितले ते संतापाने बोला शिष्य काय म्हणतील या विषयी तुमची कल्पनाशक्ती वापरा.

**आई वडील:** शिष्यांशी रागाने वाद घाला. शैक्षणिक कृतीमध्ये दिल्याप्रमाणे तुमचे स्वत:चे शब्द वापरा.

**येशू:** मार्क 10:14 मधून येशूचे शब्द ठामपणे बोला.

"बाळकांस माझ्याजवळ येऊ द्या. त्यांना मनाई करू नका, कारण देवाचे राज्य त्यांच्यासारख्यांचेच आहे."

**शिष्य:** पुढील गोष्टी तुमच्या शब्दात सांगा.

"प्रभु तुम्ही खूप कामात आहात!" "ह्या लहान लहान मुलांच्या मागे तुमचा वेळ वाया घालवू नका!"

**येशू:** पुन्हा मार्क 10:15 ह्या वचनातील येशूचे शब्द ठामपणे बोला

"मी तुम्हांस खचित सांगतो, जो कोणी बाळकासारखा होऊन देवाच्या राज्याचा स्वीकार करणार नाही त्याचा प्रवेश त्यात मुळीच होणार नाही." (मुलांना जवळ घ्या)

**निवेदक:** मार्क 10:16 हे वचन मोठयाने वाचा. मग नाटिके साठी मदत करणाऱ्या प्रत्येकाचे आभार माना.

मुलांनी ही नाटिका उपासनेच्या दरम्यान सादर केली असेल तर मुलांनी मार्क 10:13-16 विषयी वर दिलेले प्रश्न त्यांनी मोठया माणसांना विचारावेत किंवा इतर प्रश्नही तयार करून विचारावेत. त्यांना कविता आणि पाठांतराचे वचन पुन्हा म्हणायला सांगा.

**कविता:** चार मुलांना स्तोत्र 127 वचने 1,3,4,5 ही प्रत्येकी एक असे म्हणायला सांगा.

परमेश्वर जर घर बांधीत नाही तर ते बांधणाऱ्यांचे
श्रम व्यर्थ आहेत, परमेश्वर जर नगर रक्षीत नाही
तर पहारेकऱ्याचे जाग्रण व्यर्थ आहे.
पाहा फळ त्याची देणगी आहे.
तरूणपणचे मुलगे हे वीराच्या हातातील बाणांप्रमाणे आहेत.
ज्या पुरूषाचा भाता अशांनी भरला आहे तो धन्य!
वेशीवर शत्रूंशी त्यांची बोलाचाली होत असता ते फजीत होणार नाहीत.

लोक मुलांवर प्रेम करतात किंवा मोठी मुले लहान मुलांना मदत करतात या विषयावर मोठया मुलांना कविता गाणी किंवा छोटया गोष्टी लिहिण्यास सांगा.

**पाठांतराची वचने:**

- मोठया मुलांनी मार्क 10:13–15 ही वचने पाठ करावीत.
- लहान मुलांकडून मार्क 10:14 ह्या वचनातील फक्त येशूचे शब्द पाठ करून घ्या.

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net